**प्रेसनोट** **ता. २०/०९/२०२४**

**माजी नगरसेवकाच्या खुनाच्या कटातील महत्वाचा दुआ (आरोपी ) गुन्हे शाखेकडुन जेरबंद**

राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज सुर्यकांत आंदेकर यांचा दिनांक ०१/०९/२०२४ रोजी पुर्व वैमनस्यातून पिस्टलमधून गोळ्या झाडुन तसेच कोयत्याने वार करून निर्घुण खुन करण्यात आला असल्याने दाखल गुन्ह्यातील फिर्यादी सुर्यकांत उर्फ बंडु राणोजी आंदेकर यांनी प्रथम त्यांचे जावई १) गणेश कोमकर २) मुलगी संजीवनी कोमकर ३) जयंत कोमकर ४) प्रकाश कोमकर ५) सोमनाथ गायकवाड ६) अनिकेत दुधभाते, ८) तुषार ऊर्फ आबा कदम ९)सागर पवार,१०) पवन करताल ११) समीर उर्फ सॅम काळे यांचे विरूध्द तक्रार दिल्याने समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं.१८८/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),६१(२),४९,५४,१०९,१११(१) (i),(२)(३)(४),२३८सह आर्म ॲक्ट कलम ३(२५),४(२५),सह मपोका कायदा कलम ३७(१)(३)/१३५, सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ्कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांच्या विवीध टीम तयार करुन सदर पथकाव्दारे उपरोक्त आरोपी व इतर निष्पन्न आरोपी यांना अटक करण्यात आले असुन सदर गुन्हयास दिनांक १६/०९/२०२४ रोजी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे व सदर गुन्हयाचा तपास सहायक पोलीस आयुक्त श्री गणेश इंगळे गुन्हे-१ हे करीत आहेत.

सदर गुन्हयामध्ये अटक आरोपी गणेश कोमकर व त्याचे कुटुंबातील इतर अटक सदस्य आरोपी जयंत कोमकर,प्रकाश कोमकर यांचा आरोपी सोमनाथ गायकवाड व इतर आरोपीतांचा संपर्क कसा झाला? याबाबत तपास करीत असताना समर्थ पोलीस ठाणेकडील रेकॉर्डवरील आरोपी प्रसाद पांडुरंग बेल्हेकर वय-३३ वर्षे रा. २५६ नाना पेठ पुणे हा सदर गुन्हयातील अटक आरोपी गणेश कोमकर व सोमनाथ गायकवाड,तुषार कदम,अनिकेत दुधभाते व समीर काळे यांचे संपर्कात आल्याचे तांत्रिक विश्लेषणाव्दारे निष्पन्न झालेने सदर गुन्हयाचे तपास अधिकारी श्री गणेश इंगळे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना नुसार पोलीस निरीक्षक श्री शब्बीर सय्यद युनीट-१, सहायक पोलीस निरीक्षक श्री अभिजीत पाटील व पो.शि.शुभम देसाई व पो.ना.राजेंद्र लांडगे असे सर्वजण उपरोक्त आरोपीचा तांत्रिक विश्लेषणाव्दारे माग काढुन त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत सखोल तपास केला असता त्याने सांगितले की, तो व गणेश कोमकर हे एकमेकाचे चांगले परिचयाचे असुन त्यांचा एकमेकांशी वेळोवेळी संपर्क होत होता, तसेच ते वेळोवेळी वेगवेगळया कारणाने एकमेकांना भेटत असत व मोबाईलव्दारे संपर्क साधत असत, दरम्यान गणेश कोमकर याने आरोपी प्रसाद बेल्हेकर याचे माध्यमातुन अनिकेत दुधभाते,तुषार कदम याचेशी मोबाईलव्दारे संपर्क साधला तसेच सोमनाथ गायकवाड व समीर काळे यांची प्रत्यक्षात भेट घेवून गणेश कोमकर याने मयत वनराज आंदेकर यास जीवे ठार मारल्यास जामीनाबाबत आवश्यक ती मदत करणेबाबत व रोख रक्कम देणेबाबतचे आश्वासन देवुन, आरोपी गणेश कोमकर यांचेसह अनिकेत दुधभाते,तुषार कदम,सोमनाथ गायकवाड,समीर काळे यांनी मयत वनराज आंदेकर यांना जीवे ठार मारण्याचे ठरवुन व पुर्वनियोजीत कट कारस्थान रचुन त्यांचे इतर अटक आरोपीतांचे मदतीने मयत वनराज आंदेकर यांचा पिस्टलने फायर करुन व कोयत्याने वार करुन निर्घुण केल्याचे निष्पन्न झाले आहे.

एकंदरीत अटक आरोपी प्रसाद पांडुरग बेल्हेकर याचेवर आंदेकर टोळीतील ऋषभ आंदेकर याने हल्ला केल्याने सदर गोष्टीचा राग मनात धरुन त्याने अटक आरोपी गणेश कोमकर,सोमनाथ गायकवाड,तुषार कदम, समीर काळे व अनिकेत दुधभाते यांचा एकमेकांशी संपर्क होण्याकरिता दुआ (माध्यम) बनुन व कटात सहभागी होवुन मयत वनराज आंदेकर याचेवर दिनांक ०१/०९/२०२४ रोजी पिस्टलने फायर करुन व कोयत्याने वार करुन मयताचे खुनास कारणीभुत झालेने सदर आरोपीचा उपरोक्त गुन्हयामध्ये स्पष्ट सहभाग निष्पन्न झाला आहे तसेच सदर गुन्हयाचे तपासामध्ये इतर बाबींचा देखील उलगडा होण्याची दाट शक्यता आहे.

सदर आरोपीस दिनांक १९/०९/२०२४ रोजी सायंकाळी अटक केली असुन त्यास दिनांक २४/०९/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त झाली असुन सदर गुन्हयाचा आधिक तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.श्री अमितेश कुमार, सो पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा. श्री रंजनकुमार शर्मा, सो सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा. श्री शैलेश बलकवडे सो अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री निखील पिंगळे सो पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, मा. श्री गणेश इंगळे, .सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद युनिट ०१, सहा.पो.निरी अभिजीत पाटील,पो.शि.शुभम देसाई व पो.ना.राजेंद्र लांडगे यांनी केली आहे.

**(गणेश इंगळे)**
**सहा.पोलीस आयुक्त**
**गुन्हे-१,गुन्हे शाखा,पुणे शहर**